# दिनांक २६.०३.२०२१ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजीत केलेल्या राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त

.........................................................................................................................................

राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संदर्भात राज्य स्तरावरील राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीची बैठक दिनांक २६ मार्च २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता डॉ. श्री. रामास्वामी एन., मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र राज्य, यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते,

१) डॉ. अर्चना पाटील, संचालक (२), आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे
२) डॉ. राजश्री कटके, प्राध्यापक व विभाग प्रमुख, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभाग, ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर जे.जे. रुग्णालय समूह, मुंबई
३) डॉ. विनया आंबोरे, सहयोगी प्राध्यापक, शल्य चिकित्सा विभाग, ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर जे.जे. रुग्णालय समूह, मुंबई
४) डॉ. दिगंबर तुळशिराम कानगुले, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कु.क.), रा.कु.क.का., पुणे

सदर बैठकीचे विषयसूचीवरील विषय खालील प्रमाणे होते,

१) दिनांक ११.१०.२०१९ रोजी झालेल्या राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजने अंतर्गत सन २०१९-२० व २०२०-२१ (माहे डिसेंबर २०२० अखेर) मधील भौतिक व आर्थिक बाबींचा आढावा घेणे.
३) सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये माहे सप्टेंबर २०२० अखेर कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेमुळे झालेल्या मृत्यू प्रकरणांचा सविस्तर आढावा घेणे.
४) मा. अध्यक्षांच्या संमतीने ऐनवेळी उपस्थित होणा-या विषयांवर चर्चा करणे.

डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कु.क.) पुणे यांनी बैठकीसाठी व्हिडीओ कॉन्फरन्सींगव्दारे उपस्थित सर्व समिती सदस्यांचे स्वागत केले व बैठकीच्या विषयसूचीनुसार विषयांची माहिती दिली. तद्नंतर राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत एनएफएचएस ४ व ५ नुसार विविध निर्देशांकाची महाराष्ट्र राज्याची तुलनात्मक माहिती दिली.

तसेच डॉ. दिगंबर कानगुले, यांनी कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजने अंतर्गत सन २०१९-२० मध्ये व २०२०-२१ (माहे डिसेंबर २०२० अखेर) लाभ मिळण्यासाठी दावा दाखल झालेल्या एकुण असफल, गुंतागुंत व मृत्यू प्रकरणांची माहितीही दिली. तसेच कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेमुळे सन २०१९-२० मध्ये व २०२०-२१ (माहे डिसेंबर २०२० अखेर) झालेल्या मृत्येचे कारण, मृत्यूचे ठिकाण, शस्त्रक्रियेचे ठिकाण, शस्त्रक्रियेचा प्रकार, शस्त्रक्रियेनंतर किती दिवसांनी मृत्यू झाला, किती कालावधीमध्ये मृत्यू झाला आहे, याबाबतच्या विषलेषणाची माहितीही दिली.

बैठकीसाठी व्हिडीओ कॉन्फरन्सींगव्दारे उपस्थित सर्व समिती सदस्यांनी प्रत्येक विषयांस अनुसरुन तांत्रिक व प्रशासकीय बाबीसंदर्भात आपली मते मांडली. त्यानुसार काही महत्वाचे निर्णय सदर बैठकीत घेण्यात आले.

विषयसूचीतील विषयावर झालेली चर्चा व त्यानुसार घेण्यात आलेले निर्णय खालीलप्रमाणे आहेत,

- दिनांक ११.१०.२०१९ रोजी झालेल्या राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.
- राज्यस्तरावर राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमिती अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या प्रसूती तज्ञांचा समावेश असलेल्या उपसमितीमार्फत सन २०१८-१९ मधील ६, सन २०१९-२० मधील १३ व सन २०२०-२१ मध्ये माहे डिसेंबर २०२० पर्यंत झालेल्या मृत्यू प्रकरणांच्या कागदपत्रांची सखोल



Scanned with CamScanner

छाननी करून मृत्यूच्या कारणांचा शोध घेऊन मृत्यूचे कारण निश्चित करुन निष्कर्ष काढण्यात यावेत. समितीमार्फत अंतिम करण्यात आलेले मृत्यूचे कारण व निष्कर्ष धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमितीच्या पुढील बैठकीत समितीसमोर सादर करावेत असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

- राज्यातील कोरोना आजाराचा प्रादुर्भाव पाहता प्रसूती तज्ञांचा समावेश असलेल्या उपसमितीच्या बैठका माहे एप्रिल २०२१ पासून व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात याव्यात. सदर बैठकांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेमुळे मृत्यू झालेल्या जिल्ह्याचे सर्व संबंधीत जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांना संपुर्ण माहितीसह व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थित राहण्याबाबतच्या सूचना संबंधीतांना द्याव्यात असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.
- राज्यस्तरावर राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमिती अंतर्गत होणा-या कामकाजाची अद्ययावत माहिती उपसमितीच्या सर्व सदस्यांना वेळेत उपलब्ध होण्यासाठी सर्व उपसमिती सदस्यांचा समावेश असलेला एक व्हॉट्स ॲप ग्रुप तयार करण्यात यावा असे डॉ. राजश्री कटके, प्राध्यापक व विभाग प्रमुख, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभाग, ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर जे.जे. रुग्णालय समूह, मुंबई यांनी सुचविले व त्यानुसार राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमिती सदस्यांचा समावेश असलेला एक व्हॉट्स ॲप ग्रुप तयार करण्यात यावा असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कु.क.) पुणे यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून उपाध्यक्षांच्या मान्यतेने बैठक समाप्त झाल्याचे घोषित केले.

| | |
|---|---|
| सदस्य सचिव | अध्यक्ष |
| राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमिती | राज्य गुणवत्ता आश्वासन उपसमिती |
| तथा | तथा |
| अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा | आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, |
| कुटुंब कल्याण, मा.बा.सं. व शा.आ. पुणे | राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई |



Scanned with CamScanner